पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक २ ■ शुक्रवार, दि. ५ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ४
■ RNI No.-MHAR/26/A4530 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# कॉकरोच जनता पार्टीच्या जंतरमंतरवरील आंदोलनाला पोलिसांची परवानगी !

वृत्तसंस्था ६ जून

**नवी दिल्ली :** देशाच्या राजधानीत सध्या एक मोठी राजकीय आणि सामाजिक घडामोड समोर येत आहे. ऑनलाईन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रचंड सक्रिय असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या जंतरमंतरवरील प्रस्तावित आंदोलनाला अखेर दिल्ली पोलिसांनी अधिकृत परवानगी दिली आहे. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके हे अमेरिकेतून भारतात दाखल झाले असून, त्यांच्या आगमनासोबतच संघटनेला हे पहिले मोठे यश मिळाले आहे.

दिल्ली पोलिसांनी दिलेल्या परवानगीनुसार, ६ जून (शनिवार) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जंतरमंतरवर हे आंदोलन करता येणार आहे. परवानगी मिळाल्यानंतर अभिजीत दिपके यांनी स्वतः ट्विट करून समर्थकांना माहिती दिली. पोलिसांनी परवानगी दिली आहे. समर्थकांनी जंतरमंतरवर एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.




## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तक घेऊन दिपके भारतात दाखल

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके हे अमेरिकेतून दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले. यावेळी त्यांच्या स्वागतासाठी समर्थकांनी प्रचंड गर्दी केली होती. विमानतळावरून बाहेर येताना अभिजीत दिपके यांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तक होते. विमानतळ परिसरातून दिल्ली पोलिसांच्या कड्या सुरक्षेत ते एका खाजगी वाहनाने रवाना झाले.

## पंतप्रधानांसह अनेकांच्या निवासस्थानांसमोर सुरक्षा!

खबरदारीचा उपाय म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या निवासस्थानाबाहेर सुरक्षा व्यवस्था अत्यंत कडक करण्यात आली आहे. जंतरमंतर जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांवर पोलिसांनी बॅरिकेडिंग केले असून, वाहनांची कसून तपासणी केल्यानंतरच पुढे सोडले जात आहे. पोलिसांकडून मिळालेली परवानगी ही आंदोलकांसाठी मोठी बातमी ठरली असून, आता या आंदोलनाकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## थेट जंतरमंतरवर या, पोलीस ठाण्यात गर्दी करू नका!

आंदोलनाची परवानगी मिळाल्यानंतर अभिजीत दिपके यांनी आपल्या समर्थकांना शांततेचे आवाहन केले आहे. त्यांनी म्हटले की, 'सर्व समर्थकांनी संसद मार्ग पोलीस ठाण्यात न जाता थेट जंतरमंतरवर पोहोचावे. तेथे सकाळी १० वाजल्यापासून आपले शांततापूर्ण आंदोलन सुरू होईल. सर्व समर्थकांनी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मागण्या लोकशाही आणि शांततापूर्ण मार्गाने मांडाव्यात.'

# मराठा समाजातील विद्यार्थ्यांना 'ओबीसी'प्रमाणेच शैक्षणिक सवलती मिळणार



वृत्तसंस्था ६ जून

**मुंबई :** मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आता इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाप्रमाणेच सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधांचा लाभ मिळणार आहे. शुक्रवारी, सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जारी केला.

चालू शैक्षणिक वर्षापासूनच या तरतुदी लागू करण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना ऑनलाईन लाभ मिळण्यासाठी 'महाडीबीटी' पोर्टलवर तातडीने आवश्यक ते तांत्रिक बदल करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी इतर मागास वर्ग प्रवर्गाच्या धर्तीवर सर्व शैक्षणिक सवलती व सोयी सुविधा देण्यासाठी शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी आणि कौशल्य विकास यांसह संबंधित सर्व प्रशासकीय विभागांना चालू तसेच आगामी वित्तीय वर्षात स्वतंत्र व पुरेशा निधीची तरतूद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यानुसार, इतर मागास वर्ग प्रवर्गाला लागू असलेली 'शालांत परीक्षेत्तर शिष्यवृत्ती योजना' मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही लागू करण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती आता मराठा विद्यार्थ्यांनाही लागू असेल.

त्याचप्रमाणे 'ओबीसी' उमेदवारांसाठी लागू असलेली मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना आता नियोजन विभागामार्फत 'सारथी' संस्थेच्या वतीने मराठा उमेदवारांसाठी राबवली जाईल. खासगी तसेच पीपीपी मॉडेल अंतर्गत कार्यरत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांसाठी 'व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना' राबवण्यात येईल. अनुदानित व विना-अनुदानित महाविद्यालयांतील ओबीसी विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर १६ बाबींची प्रतिपूर्ती मराठा विद्यार्थ्यांनाही मिळेल. यासोबतच, महाराष्ट्रातील रहिवासी असणाऱ्या व परराज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांनाही हा लाभ लागू असेल. केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही ओबीसीप्रमाणेच शैक्षणिक सवलती लागू असतील.

**भविष्यातील सवलती आपोआप लागू होणार :** एवढेच नाही तर, या शासन नमूद केलेल्या सवलतींव्यतिरिक्त इतर मागास प्रवर्गाला सध्या लागू असलेल्या किंवा भविष्यात लागू केल्या जाणाऱ्या कोणत्याही नवीन शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा, पुढील आदेशाची वाट न पाहता मराठा समाजाला आपोआप लागू होतील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**मंत्रिमंडळ उपसमिती वेळोवेळी आढावा घेणार :** या शासन निर्णयांतर्गत मराठा समाजाच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारसींवर करायच्या कार्यवाहीबद्दल विविध विभागांमार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा गठीत समितीमार्फत घेण्यात येईल.

# तू आम्हाला दारू पाजतो का, नकार देताच वाद झाला अन् मोठ्या दगडाने जीव घेतला

प्रतिनिधी ६ जून

**अमरावती :** शेतात काम करीत असलेल्या युवकाने मद्य पाजण्यास नकार देताच त्याला जबर मारहाण करण्यात आली. अर्धमेला झालेल्या त्या युवकाच्या चेहऱ्यावर मोठा दगड टाकून त्याला ठार करण्यात आले. तालुक्यातील राजना येथे बुधवारी मध्यरात्रीनंतर ही घटना घडली. पोलिसांनी या प्रकरणी दोघांना अटक केली आहे.

पोलिस सूत्रांनुसार, नितीन भगत (३०) असे मृताचे नाव आहे. रोशन मेश्राम व प्रफुल राऊत अशी मारेकऱ्यांची नावे आहेत. ते सर्व राजना गावातील रहिवासी आहेत. तक्रारीनुसार, परिसरातीलच मोहम्मद आसिफ मोहम्मद खालीद यांच्या शेतात बुधवारी रात्री नितीन भगत हा ट्रॅक्टरने शेणखत टाकत होता. यावेळी त्याच्यासोबत मयूर मधुकर चौधरी, सूरज विजय मेश्राम, बाळकृष्ण गंगाराम मेश्राम व प्रवीण गंगाराम मेश्राम हेही काम करीत होते.

रात्री दीडच्या सुमारास रोशन मेश्राम व प्रफुल राऊत यांचा नितीनला फोन आला आणि पाठोपाठ तेही दाखल झाले. रोशन मेश्राम व प्रफुल राऊत यांनी नितीन भगत याला 'तू आम्हाला दारू पाजतो का,' अशी विचारणा केली. उत्तररात्र झालेली असल्याने काम लवकरात लवकर संपविण्याच्या तयारीत असलेल्या नितीनने त्यांना नकार दिला. यामुळे चिडलेल्या आरोपींनी नितीनला लोखंडी सत्तूर, फावड्याने जबर मारहाण करीत गंभीर जखमी केले. नंतर मोठा दगड मृताच्या डोक्यावर टाकून त्याला ठार केले. नितीनसोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांनी त्याच्या भावाला घटनाक्रम कळविला. यानंतर पोलिसांना कळविले.

# वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट'; बसविण्याची अंतिम मुदत ३० जून

प्रतिनिधी ६ जून

**अमरावती :** केंद्रीय मोटार वाहन नियमान्वये महाराष्ट्र शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची तरतूद केली आहे. वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची अचूक ओळख पटविणे आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविणे आवश्यक असून सर्वोच्च न्यायालयानेही तसे निर्देश दिले आहेत. जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांसह शासकीय, निमशासकीय कार्यालये व बँकांनी त्यांच्या १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. यापूर्वी यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात



आली होती, परंतु आता ही मुदत वाढवून ३० जून २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. विहित मुदतीनंतर एचएसआरपी नंबरप्लेट नसलेली वाहने किंवा बनावट एचएसआरपी असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाईल, तसेच अशा वाहनांचे परिवहन कार्यालयातील कामकाज थांबविण्यात येईल, असा इशारा प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिला असून सर्व वाहनधारकांनी ३० जूनपूर्वी ही नंबर प्लेट बसवून घ्यावी.

# किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा !

प्रतिनिधी ६ जून

**रायगड :** दुर्गदुर्गेश्वर किल्ले रायगडावर आज छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात येत आहे. या सोहळ्याला देशभरातून हजारो शिवभक्तांची मांदियाळी राजगडावर जमली असून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिणामी किल्ले रायगडावर शिवमय वातावरण निर्माण झाले असून अवघा रायगड महाराजांच्या जयजयकाराने दुमदुमला



आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा आज किल्ले रायगडावर साजरा होत आहे. हा नेत्रदीपक सोहळा अनुभवण्यासाठी देशभरातून शिवभक्त किल्ले रायगडावर दाखल झाले आहेत. राज सदरेवरील मेघडंबरीला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे.

भगवे झेंडे, पताका, पोवाडे आणि शिवरायांचा जयजयकार यामुळे वातावरण शिवमय झाले आहे. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला ध्वजवंदनाने सुरुवात होईल. त्यानंतर शिवपालखी वाजत गाजत राजसदरेवर येईल आणि शिवराज्याभिषेकाचा मुख्य सोहळा सुरू होईल. उत्सव मूर्तीस अभिषेक झाल्यानंतर सिंहासनारूढ शिवपुतळ्याला सुवर्ण मुद्रांचा अभिषेक केला जाईल. युवराज संभाजीराजे छत्रपती महाराज यांच्या मार्गदर्शनानंतर राजसदर ते जगदीश्वर मंदिर अशी पालखी मिरवणूक निघेल.

# अनुसूचित जातीच्या शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

## मोफत शिक्षणासह मिळणार विविध सुविधा

प्रतिनिधी ६ जून

**अमरावती :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अमरावती जिल्ह्यात अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी चालविण्यात येणाऱ्या शासकीय निवासी शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतच्या पात्र विद्यार्थ्यांना या शाळांमध्ये निवासी राहून सर्व सोयी-सुविधांसह मोफत शिक्षण दिले जाणार आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी निसर्गरम्य वातावरण, भव्य व सुसज्ज शासकीय इमारत, तज्ज्ञ शिक्षकवृंद, सुसज्ज ग्रंथालय, संगणक प्रयोगशाळा, राहण्याची उत्तम व्यवस्था, मोफत शैक्षणिक साहित्य व गणवेश, खेळाचे साहित्य, नाश्ता व भोजनाची व्यवस्था तसेच अद्ययावत डिजिटल रुमद्वारे उत्कृष्ट अध्यापनाची सोय शासनातर्फे करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील मुलांसाठी नांदगांव खंडेश्वर (ता. नांदगांव खंडेश्वर), तुळजापुर (ता. चांदुर रेल्वे), सामदा (ता. दर्यापुर) व बेनोडा (ता. वरुड) येथे तर मुलींसाठी हिंगणगांव-कासारखेड (ता. धामणगांव रेल्वे), बुरडघाट (ता. अचलपुर) व पांढरी (ता. अंजनगांव सुर्जी) या शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी अधिक माहितीकरिता व प्रवेश अर्जासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांशी थेट संपर्क साधावा.



# हिरव्या वांग्यांना का आहे इतकी मागणी?

## विदर्भासह सात राज्यांत वाढली मागणी

प्रतिनिधी ६ जून

**अमरावती :** अचलपूर तालुक्यातील पथ्रोट, जवळापूर येथील हिरव्या वांगीला विदर्भासह अन्य सात राज्यांमध्ये मागणी वाढली आहे. मे अखेरच्या आठवड्यापासून या हिरव्या वांगीची तोड सुरु झाली. जूनच्या पहिल्या आठवड्यात या वांगीला अपेक्षेप्रमाणे भाव मिळत आहे.

३० वर्षांपासून या हिरव्या वांगीचे उत्पन्न परिसरातील शेतकरी घेत आहेत. वांगी निघायला सुरुवात झाली आहे. दर आठवड्याला या वांगीची तोड केली जात आहे. शेतात तोडलेली ही वांगी २० किलोच्या पन्नीत भरून शेतालगतच्या मुख्य रस्त्यावर गोळा केली जात आहेत. ही वांगी स्थानिक व्यापाऱ्यांसह अंजनगाव, अचलपूर परतवाडा येथील व्यापारी सध्या साडेपाचशे रुपये प्रतिक्विंटल या भावाने शेतकऱ्याकडून विकत घेत आहेत. विकत घेतलेली ही वांगी ट्रकमध्ये भरून जिल्ह्याबाहेर पाठविली जात आहेत. चव आणि गुणवत्ता बघून या हिरव्या वांगीला विशेष मागणी आहे. दररोज गावातून ट्रक भरून वांगी विविध बाजारपेठांमध्ये व्यापाऱ्यांकडून पोहोचवल्या जात आहे. विदर्भातील नागपूर, भंडारा, तुमसर, गोंदिया, गडचिरोली, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, चंद्रपूर यासह विविध भागांमध्ये हिरव्या वांगीची मागणी वाढली आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगढ़, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांसह अन्य राज्यांतही ही हिरवी वांगी पाठविली जात आहेत. अमरावती जिल्ह्यात जांभळ्या रंगाची वांगी सर्वाधिक खाल्ली जातात.

एप्रिल-मे केली जाते लागवड महिन्यामध्ये हिरव्या वांगीची लागवड एप्रिल-मेमध्ये होते. मोर्शी (खेड) आणि अंजनगाव येथील नर्सरीमधून रोपे मागवून भर उन्हात त्यांची लागवड केली जाते. अल्पावधीतच या रोपांचे रूपांतर झाडात होते. वांगी लागायला सुरुवात होते.

# मुंबईत ऑटो भाडेवाढीचा बॉम्ब फुटणार !

प्रतिनिधी ५ जून

**मुंबई :** वाढत्या महागाईने आधीच सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडवले असताना आता मुंबईकरांसमोर आणखी एक मोठे आव्हान उभे ठाकले आहे. एलपीजी, पीएनजी आणि इतर इंधनांच्या वाढत्या दरांनंतर आता मुंबईतील रिक्षा प्रवासही महाग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबई महानगर प्रदेशातील (श्ईं) रिक्षा भाडेवाढीचा प्रस्ताव अंतिम निर्णयाच्या उंबरठ्यावर पोहोचला असून, येत्या काही दिवसांत त्यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या (श्ईंऊँ) आगामी बैठकीत या प्रस्तावावर चर्चा होणार असून, मंजुरी मिळाल्यास १ जुलैपासून रिक्षा भाड्यात वाढ लागू होऊ शकते. त्यामुळे दररोज रिक्षाने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांच्या खिशावर अतिरिक्त भार पडण्याची चिन्हे आहेत.



रिक्षा भाडेवाढीमागे मुख्य कारण म्हणजे गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने वाढत असलेले सीएनजीचे दर. इंधन खर्च वाढल्यामुळे सध्याच्या भाड्यात रिक्षा चालवणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचा दावा रिक्षाचालक संघटनांनी केला आहे.

मुंबई रिक्षामेन्स युनियनने यासंदर्भात प्रादेशिक परिवहन कार्यालयाकड (RTO) सविस्तर निवेदन सादर केले आहे.

वाढत्या इंधन खर्चाबरोबरच वाहनांची देखभाल, सुटे भाग, विमा आणि इतर खर्चही वाढले असल्याने सध्याच्या भाड्यात व्यवसाय चालवणे कठीण झाल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. यापूर्वी राज्यभरातील शालेय बसच्या भाड्यात वाढ जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर आता रिक्षा भाडेवाढीचा मुद्दा पुढे आला असून, वाहतूक क्षेत्रातील वाढत्या खर्चाचा परिणाम थेट प्रवाशांवर होण्याची शक्यता आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रिक्षा संघटनांनी किमान भाडे २३ रुपयांवरून थेट २७ रुपये करण्याची मागणी केली आहे. जर हा प्रस्ताव मंजूर झाला, तर प्रत्येक रिक्षा प्रवासासाठी मुंबईकरांना किमान ४ रुपये अधिक मोजावे लागतील.

याचा परिणाम केवळ नियमित रिक्षा प्रवाशांवरच नव्हे तर शेअरिंग रिक्षा वापरणाऱ्या प्रवाशांवरही होणार आहे. मुंबई आणि उपनगरांतील अनेक भागांत शेअरिंग रिक्षा ही स्वस्त आणि सोयीची वाहतूक व्यवस्था मानली जाते. मात्र भाडेवाढीनंतर या सेवांचे दरही वाढण्याची शक्यता आहे.

**प्रवासी संघटनांचा विरोध :** संभाव्य भाडेवाढीच्या बातमीनंतर प्रवासी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आधीच वाढत्या महागाईमुळे घरगुती खर्च वाढला असताना आणखी एक आर्थिक भार सामान्य नागरिकांवर टाकणे योग्य नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

लोकल ट्रेन, मेट्रो, बस आणि इतर वाहतूक सेवांच्या खर्चात झालेल्या वाढीमुळे नागरिकांचे मासिक बजेट आधीच ताणले गेले आहे. अशा परिस्थितीत रिक्षा भाडेवाढ झाल्यास कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांना सर्वाधिक फटका बसू शकतो.

**१ जुलैकडे सर्वांचे लक्ष :** आता रिक्षाचालकांच्या मागण्या आणि प्रवाशांच्या चिंता यामध्ये संतुलन साधण्याचे मोठे आव्हान श्ईंऊँ समोर आहे. आगामी बैठकीत कोणता निर्णय घेतला जातो याकडे संपूर्ण मुंबईचे लक्ष लागले आहे.

१ जुलैपासून रिक्षा भाडेवाढ लागू होणार की मुंबईकरांना दिलासा मिळणार, याचा अंतिम निर्णय लवकरच स्पष्ट होणार आहे. महागाईच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय लाखो प्रवाशांच्या दैनंदिन खर्चावर थेट परिणाम करणारा ठरणार आहे.

## हंगामाच्या तोंडावर खतांची भाववाढ, शेतकरी संकटात

**अकोला :** शेतमालाची आयात करून शेतमालाचे भाव पडण्याचे कारस्थान करताना कोठलीही कसर न सोडणाऱ्या काळात रासायनिक खताच्या एका पोत्यामागे सरासरी २०० ते ५०० रुपयांपासून १ हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. ही भाववाढ संयुक्त खतांसह युरियाच्या भावातही आहे.

जानेवारी महिन्याच्या सुरुवातीपासूनच खतांचे भाव वाढणार, याची चर्चा होतीच. अखेर ती खरी ठरली आहे. नाईलाजाने ही महागडी खते वाढीव दराने शेतकऱ्यांना खरेदी करावी लागणार आहे. संयुक्त खतांची भाववाढ हंगामाच्या तोंडावरच झाली आहे. विशेषतः शेतमालाचे हमी भाव जाहीर झाल्यानंतर ही भाववाढ झाली आहे.

शेतकऱ्यांना अगतिक समजणे थांबणार तरी कधी असा प्रश्न उपस्थित होत आहे. कच्च्या मालाचे आंतरराष्ट्रीय बाजारात भात वाढल्याचे कारण देत हा खताच्या दरवाढीचा दणका दिला गेला आहे. नवीन दरवाढीनुसार १२-३२-१६, या खताच्या एका पोत्याची किंमत पूर्वी १ हजार १०० रुपये होती.

# भ्रष्टाचाराची फेड : आजची लाच, उद्याचा नरक

पैसा हे साधन आहे, साध्य नाही. पण जेव्हा माणूस पैशालाच सर्वस्व मानतो, तेव्हा त्याचा प्रवास अधोगतीकडे सुरू होतो. आयुष्य जगतांना तुम्ही स्वस्वार्थासाठी प्रत्येक व्यवहारात पैसा, जागोजागी भ्रष्टाचार, लाचलुचपत आणि कमिशन खात राहिला तर त्याचे परिणाम फक्त कायद्यापुरते मर्यादित नसतात. ते माणसाचे आयुष्य, कुटुंब आणि आत्मा पोखरून टाकतात. भ्रष्टाचार कधीच एका रात्रीत होत नाही. त्याची सुरुवात होते एका छोट्या तडजोडीने. एकदा घेतली तर काय बिघडते, सगळेच घेतात, पगारात भागत नाही अशी कारणे देऊन माणूस स्वतःच्या मनाची समजूत काढतो. पहिली लाच घेताना हात थरथरतात. दुसऱ्यांदा थोडे बरे वाटते. तिसऱ्यांदा ती सवय होते. आणि मग तीच कमाई वाटू लागते. पण लक्षात ठेवा, गंगा जशी हिमालयातून निघते तेव्हा शुद्ध असते, तसेच प्रत्येक मनुष्य जन्मतः निर्मळ असतो. त्याला भ्रष्टाचाराचे खत पाणी मिळाले की तीच गंगा गटार होते.

लाचेच्या पैशाने तुम्ही मोठा बंगला बांधाल, महागडी गाडी घ्याल, मुलांना इंग्रजी शाळेत टाकाल. वरवर पाहता सगळे सुखी दिसेल. पण आतून काय घडते? तर तुमचेच आरोग्य बिघडते. रात्री झोप लागत नाही. सतत भीती. कोणी पाहिले तर, चौकशी आली तर या तणावाने रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार जडतात. लाचेचा पैसा दवाखान्यातच खर्च होतो.

वडील कसे कमावतात हे मुले बरोबर ओळखतात. त्यांना संस्कार कसे देणार? पैसे फेकले की काम होते हेच ते शिकतात. उद्या तीच मुले तुमचा काळा पैसा हिरावून, म्हातारपणी तुमचे हाल करतील. तुम्हाला वृद्धाश्रमात टाकतील, कारण त्यांच्यासाठी नाती नाहीत, फक्त व्यवहार राहील.

जिथे पैशाचा खुळखुळाट असतो, तिथे प्रेमाची शांतता नसते. पती-पत्नीमध्ये संशय, भावंडांमध्ये संपत्तीसाठी भांडणे, नातेवाईक फक्त स्वार्थासाठी जवळ येणे. हे कुटुंब राहते का? ही फक्त एकत्र राहणारी माणसे असतात.

समाधान विकत मिळत नाही. ते रात्री बिनधास्त झोपण्यात आहे. ते स्वतःच्या कष्टाच्या भाकरीत आहे. लाचेचा पैसा कितीही आला तरी अजून पाहिजे ही हाव संपत नाही. आणि जिथे हाव आहे, तिथे समाधान कधीच नसते.

समजा आयुष्यभर तुम्ही पकडले गेला नाहीत. पण तुमच्या कर्माचा हिशोब कोण चुकवणार? संत तुकाराम म्हणतात, 'जैसे ज्याचे कर्म तैसे त्याचे फळ.' आज ना उद्या कायदा तुमच्यापर्यंत पोहोचतोच. आणि मग एका क्षणात इज्जत, नोकरी, घरदार सगळे जाते. समाजात तोंड दाखवायला जागा राहत नाही. तुरुंगातील अंधारकोठडी आणि चार भिंती हेच भविष्य होते.

तारुण्यात केलेला भ्रष्टाचार म्हातारपणी यातना बनून येतो. कोणी विचारत नाही. पैसा असतो, पण औषध पाजायला हक्काचे माणूस नसते. एकटेपणा



आणि रोग खाऊन टाकतात. ज्याच्याकडून तुम्ही लाच घेतली, तो गरीब शेतकरी, विधवा बाई, बेरोजगार तरुण. त्यांच्या डोळ्यातले पाणी आणि मनातला तळतळाट तुम्हाला लागल्याशिवाय राहत नाही. बुडत्याचा पाय खोलात ही म्हण खरी ठरते.

नरक कुठे वेगळा नसतो. जिवंतपणीच त्याची सुरुवात होते. अपमान, रोग, एकटेपणा, मुलांचे दुर्लक्ष हाच नरक. आणि मृत्यूनंतर? पुराण सांगते, पापी माणसाला यमपूरी ओढत नेते. लाचखोराला यमयातना भोगाव्या लागतात. कारण तुम्ही फक्त पैसा खाल्ला नाही, तर लोकांचा विश्वास खाल्ला, व्यवस्थेचा आत्मा मारला.

अंधार कितीही दाट असला तरी एक पणती उजेड देऊ शकते. आजपासून निश्चय करा, 'कुणाचेही मन दुखवून, यापुढे एक रुपयाही लाचेचा घेणार नाही.' सुरुवात अवघड आहे, पण अशक्य नाही. पगार कमी असेल, पण तो घामाचा असेल. त्यात बरकत असते. मुलांना सांगा, आपण गरीब असू, पण लाचार नाही. कायद्याला कदाचित चुकवता येईल, पण स्वतःच्या मनाला आणि वर बसलेल्या परमेश्वराला आणि नियतीला कसे चुकवणार? तुम्ही एखाद्याचे काम करून देण्यासाठी किंवा फाईल मंजूर करण्यासाठी, एका फाईलसाठी किंवा विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी ५०० रुपये मागितले, त्यासाठी समोरच्या व्यक्तिला, घरच्या बाईचे सोनं विकावं लागलं, कर्ज काढावे लागले. किंवा जिवनावश्यक किराणा अन्नधान्याचे पैसे तुम्हाला द्यावे लागले आणि त्याचे लेकरू उपाशी झोपले. तर तुमचा एक स्वार्थ अनेकांचे श्राप घेण्यास, त्यांचा तळतळाट घेण्यास कारणीभूत ठरतो.

लाचखोरांनो, लक्षात घ्या. मृत्युपूर्वी असहाय्य, मजबूर किंवा दुर्बलांच्या शापामुळे येणारे मरण ओढवून घेऊ नका. कारण मृत्युनंतर तुम्ही कमविलेली

संपत्ती इथेच राहते. फक्त तुमचे कर्म सोबत येते. इतर कोणतीच धनदौलत, पैसा अदला सोबत जात नाही. स्मशानात जाताना अंगावरचा करदोळा सुद्धा तोडून टाकतात. कोऱ्या कापडात गुंडाळून सरणावर ठेवतात मग कशासाठी तुमचा लोभ ? कशासाठी एवढा अट्टाहास?

लालबहादूर शास्त्री पंतप्रधान होते, पण मृत्यूनंतर त्यांच्या घरात काहीच पैसा अदला शिल्लक नव्हता. एपीजे अब्दुल कलाम राष्ट्रपती होते, पण अखेरपर्यंत साधेपणाने जगले. या नेत्यांना लोक आजही देवासारखे पूजतात. कारण त्यांनी पैसा नाही, शान शौकत नाही तर माणुसकी कमावली. सत्कर्म केलीत.

याउलट अनेक भ्रष्ट अधिकारी, पुढारी आज तुरुंगात आहेत किंवा समाजात तोंड लपवून फिरत आहेत. त्यांच्या मुलांनीही नावे बदलली. हे वास्तव आहे.

म्हणूनच वेळीच सावध व्हा. लाचेचा, कमिशनचा, भ्रष्टाचाराचा पैसा म्हणजे पेटता निखारा आहे. तो हातात ठेवला तर हात भाजणारच. तो फेकून द्या आणि कष्टाच्या, प्रामाणिकपणाच्या वाटेने चाला. तिथेच खरे सुख, खरे समाधान आणि खरा स्वर्ग आहे. नाहीतर भविष्य अंधःकारात आहे, त्यामुळे तुम्हाला नरकातही जागा मिळणार नाही.

भ्रष्टाचाराने मिळालेला पैसा तुम्हाला संपत्तीने मोठे करू शकतो, पण मानवतेचे महान कधीच नाही. आणि तुम्हाला माणूस म्हणून जगायचे असेल तर मोठे नाही, सज्जन व्हावे लागेल. महान व्हावे लागेल.

**संजय कडोळे**
ज्येष्ठ साहित्यिक, लोककलावंत गोंधळी नगर, कारंजा (लाड), जि. वाशिम मो. ९०७५६३५३३८

# शासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी लोकाभिमुख व्हावे

आपल्या देशात अनंत समस्या आहेत. नागरिक घराबाहेर पडला, आणि डोळसपणे बघितले तर समस्या दिसते. परंतू स्वतः ला त्रास होईपर्यंत समस्येची जाणीव कोणालाही होत नाही. अथवा त्याकडे लक्ष देण्याची गरज भासत नाही. कारण पर दुःख हे शितल असते. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना, तक्रार येई पर्यंत नागरिकांना समस्या असू शकते याची कल्पनाच नसते. काही समस्यांसाठी नागरिक तर काहींसाठी प्रशासन जबाबदार आहे. गावात तसेच महानगरात बदलून आलेल्या बहुतांश प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना त्यांची बदली होई पर्यंत, गाव तसेच महानगराचा पूर्ण परिचय देखील नसतो, कनिष्ट अधिकारी आणि अधिनस्त कर्मचाऱ्यांनी पुरवलेल्या माहितीच्या आधारावर ते आपले मत बनवत असतात. आणि त्या अनुषंगाने आपल्या कामाची पद्धती निश्चित करतात. अधिकारी परराज्याचे किंवा इतर शहराचे असल्यामुळे त्यांना ते गाव तसेच महानगराबद्दल आपुलकी नसते. आपल्याला ठराविक काळा नंतर नवीन ठिकाणी बदलून जायचे आहे, याची त्यांना जाणीव असते. त्यामुळे गाव, महानगराच्या समस्या तसेच विकासाचा ताप ते डोक्याला लावून घेत नाहीत.

अनेक नागरिकांना आपल्या गावात वा महानगरात प्रशासनाच्या कुठल्या कार्यालयात कोण अधिकारी आहे हे फक्त नावानीच माहिती असते. काहींना तर त्याची पण कल्पना नसते. प्रशासनातील अधिकारी हे लोकसेवक आहेत. मात्र बहुतांश आपल्याच कोषात जगतात. ते लोकात मिसळणे सहसा टाळतात. बोटावर मोजण्या इतके अधिकारी लोकाभिमुख असतात. प्रशासनातील अधिकाऱ्यांची दिनचर्या अतिशय व्यस्त असते, याची पूर्ण कल्पना आहे. तरी अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात वर्षातून चार वेळा नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी लोकाभिमुख व्हावे. लोकप्रतिनिधींनी यासाठी राजकारण बाजूला ठेवून स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेऊन सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांच्या भेटींचे आयोजन करावे. नागरिकांनी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या सन्मानाची जपणूक करून अतिशय सामंजस्याने आपल्या समस्या मांडाव्यात. यामुळे नागरिकांच्या समस्यांचा निपटारा जलदगतीने होवून, विकासाची कामे मार्गी लागू शकतात. कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीत देखील काही अंशी फरक पडू शकतो. नागरिकांच्या मनात अधिकारी आणि लोकप्रतिनिधी बद्दल आपुलकी निर्माण होवून, त्यांचा दृष्टीकोन बदलू शकतो. प्रशासन आपली दखल स्वतः हून घेते, हि भावना अत्यंत सुखावणारी असते. या उपक्रमामुळे शासन आपल्या दारी हि संकल्पना देखील पूर्ण होइल. मात्र यासाठी प्रशासनाचे अधिकारी तसेच जनप्रतिनिधींच्या इच्छाशक्तीची आणि नागरिकांच्या सहकार्याची नितांत आवश्यकता आहे.

**हेमंत जकाते**
अकोला.

# शिवराज्याभिषेक : स्वराज्याच्या सार्वभौमतेचा सुवर्णक्षण

भारतीय इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतात. अशा घटनांपैकी एक अत्यंत महत्त्वाची आणि गौरवशाली घटना म्हणजे छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होय. ६ जून १६७४ रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर संपन्न झालेला हा सोहळा केवळ एका राजाच्या सिंहासनारोहणाचा कार्यक्रम नव्हता, तर तो हिंदवी स्वराज्याच्या सार्वभौमतेची जगासमोर झालेली अधिकृत घोषणा होती. या ऐतिहासिक प्रसंगाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाला नवे वळण दिले. अनेक शतकांपासून परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली असलेल्या जनतेच्या मनात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारा हा क्षण होता. म्हणूनच ६ जून हा दिवस महाराष्ट्रासाठी आणि संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा, प्रेरणेचा आणि राष्ट्रभक्तीचा दिवस मानला जातो.

सतराव्या शतकातील भारताचा इतिहास पाहिला तर देशाची राजकीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती. दिल्लीतील मुघल सत्ता विस्ताराच्या शिखरावर होती. दक्षिणेत आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांसारख्या विविध सत्तांचे वर्चस्व होते. सामान्य जनता करांचा बोजा, अन्याय, अत्याचार आणि असुरक्षिततेच्या वातावरणात जीवन जगत होती. समाजामध्ये निराशा आणि परावलंबित्वाची भावना वाढीस लागली होती. अशा वेळी महाराष्ट्राच्या मातीत एक असे व्यक्तिमत्त्व उदयास आले ज्याने स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात साकार करून दाखविले. १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर जन्मलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना माता जिजाऊंनी रामायण, महाभारत आणि भारतीय संस्कृतीतील आदर्शांचे संस्कार दिले. अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि दुर्बलांचे रक्षण करण्याची प्रेरणा बालपणापासूनच त्यांच्या मनात रुजली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत लहान वयात स्वराज्य उभारणीचा संकल्प केला. त्या काळात स्वतंत्र राज्य निर्माण करणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. परंतु दृढनिश्चय, धाडस आणि जनतेवरील विश्वास यांच्या बळावर त्यांनी स्वराज्याचा पाया रचला. तोरणा किल्ला जिंकून त्यांनी स्वराज्याच्या स्थापनेची पहिली पायरी गाठली. त्यानंतर राजगड, पुरंदर, कोंढाणा, प्रतापगड, जावळी यांसारख्या अनेक प्रदेशांवर स्वराज्याचा झेंडा फडकला. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील धाडसी हल्ला, सुरतेवरील मोहीम आणि आग्र्याहून केलेली थरारक सुटका या घटनांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची कीर्ती संपूर्ण भारतभर पसरली. त्यांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर लोकांच्या मनात स्वराज्याची भावना निर्माण केली.

राज्याभिषेकाच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करण्यात आले. रायगड किल्ला सजविण्यात आला. संपूर्ण स्वराज्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. देशभरातील विद्वान, संत, पंडित, सरदार आणि मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले. काशीचे प्रसिद्ध वेदपंडित गागाभट्ट यांना



राज्याभिषेक विधीचे प्रमुख म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशावळीचा अभ्यास करून त्यांना क्षत्रिय असल्याचे प्रमाणित केले. त्यामुळे राज्याभिषेकास धार्मिक आणि सामाजिक मान्यता प्राप्त झाली.

राज्याभिषेकासाठी अनेक दिवस यज्ञ, हवन, पूजा आणि धार्मिक विधी सुरू होते. रायगडावर हजारो लोक जमले होते. प्रत्येकाच्या मनात उत्सुकता आणि अभिमानाची भावना होती. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर स्वराज्याला अधिकृत स्वरूप प्राप्त होणार होते. ६ जून १६७४ रोजी पहाटे राज्याभिषेकाचा मुख्य सोहळा पार पडला. त्यानंतर सुवर्णसिंहासनावर त्यांना विराजमान करण्यात आले. त्या क्षणी रायगडाच्या भूमीवर इतिहास घडत होता. अनेक शतकांनंतर भारतीय भूमीवर एका स्वतंत्र हिंदवी राज्याच्या सार्वभौम राजाचा राज्याभिषेक होत होता. हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वांत अभिमानास्पद क्षणांपैकी एक मानला जातो.

राज्याभिषेकामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना धार्मिक, सामाजिक आणि राजकीय मान्यता मिळाली. त्यांच्या सत्तेला वैधानिक स्वरूप प्राप्त झाले. स्वराज्याचा स्वतंत्र शासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. याच वेळी स्वतंत्र राजमुद्रा स्वीकारण्यात आली. राजमुद्रेवरील श्लोक स्वराज्याच्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक होता. प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढणारे आणि लोककल्याणासाठी कार्य करणारे राज्य ही त्यामागील संकल्पना होती. राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासन अधिक मजबूत केले. अष्टप्रधान मंडळाची रचना अधिक प्रभावीपणे कार्यरत झाली. पेशवा, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत, सेनापती, न्यायाधीश आणि पंडितराव या आठ प्रमुख पदांमार्फत राज्यकारभार चालविला जात होता. प्रत्येक विभागाची स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. शासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे स्वराज्याची प्रशासनव्यवस्था त्या काळातील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी ठरली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार लोककल्याणकारी होता. त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण केले. जमिनीचे मोजमाप करून न्याय्य महसूल पद्धती लागू केली. शेतकऱ्यांवर अतिरिक्त करांचा भार टाकला गेला नाही. दुष्काळ किंवा संकटाच्या काळात त्यांना मदत पुरविण्यात आली. त्यामुळे स्वराज्यातील कृषीव्यवस्था मजबूत झाली. जनतेच्या कल्याणासाठी शासन असावे, ही त्यांची भूमिका होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना 'रयतेचा राजा' असे संबोधले जाते. स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. युद्धात शत्रूपक्षातील स्त्रियांनाही सन्मानाने वागणूक दिली जात असे. धार्मिक सहिष्णुता हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात विविध धर्मांचे लोक कार्यरत होते. मशिदी, दर्गे आणि मुस्लिम धर्मीयांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात आले. त्यांचा संघर्ष कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता, तर अन्यायकारक आणि अत्याचारी सत्तेविरुद्ध होता. त्यामुळे स्वराज्य हे सर्वधर्मसमभाव आणि न्याय यांवर आधारित होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी संरक्षणव्यवस्थेतही अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांनी किल्ल्यांचे सशक्त जाळे उभारले. प्रत्येक किल्ल्याचे सामरिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांचा विकास केला. गनिमी कावा ही युद्धपद्धती प्रभावीपणे वापरून त्यांनी बलाढ्य शत्रूंना पराभूत केले. राज्याभिषेकामुळे स्वराज्याला नवीन ऊर्जा प्राप्त झाली. मराठा साम्राज्याच्या विस्ताराला गती मिळाली. पुढील काळात मराठा सत्ता महाराष्ट्राबाहेरही विस्तारली. स्वराज्याची संकल्पना संपूर्ण भारतात पोहोचली. अनेकांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे शिवराज्याभिषेक हा केवळ महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्हे, तर भारतीय राष्ट्रचेतनेच्या इतिहासातीलही एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

आधुनिक काळात शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व अधिक व्यापक झाले आहे. आज भारत एक लोकशाही राष्ट्र आहे. लोकशाहीतील अनेक मूल्ये जसे की सुशासन, लोककल्याण, न्याय, समानता आणि उत्तरदायित्व यांची झलक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यात दिसून येते. त्यांनी दाखविलेला आदर्श आजच्या प्रशासकांसाठी, राजकारण्यांसाठी आणि समाजनेत्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, स्त्रियांचा सन्मान, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या मूल्यांची आजही समाजाला गरज आहे.

दरवर्षी ६ जून रोजी महाराष्ट्रासह देशभरात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा केला जातो. रायगडावर विशेष सोहळ्यांचे आयोजन केले जाते. हजारो शिवभक्त, इतिहासप्रेमी आणि पर्यटक रायगडावर जाऊन महाराजांना अभिवादन करतात. विविध ठिकाणी व्याख्याने, प्रदर्शन, पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक मिरवणुका आयोजित केल्या जातात. या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत शिवचरित्र पोहोचविण्याचे कार्य केले जाते.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
समाजशास्त्राचे अभ्यासक

## दिन विशेष

# भारताच्या इतिहासातील एक सुवर्ण क्षण!

शिवराज्याभिषेक दरबार, जुलिअन तारीख ६ जून १६७४. या दिवशी पहिले अष्टप्रधान मंडळ स्थापण्यात आले. शिव राजाभिषेक, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शालिवाहन शके १५९६. छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक ही ऐतिहासिक दृष्टीने महत्वाची घटना मानली जाते. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शालिवाहन शके १५९६ रोजी स्वतःस राज्याभिषेक करून घेतला आणि एका सार्वभौम राज्याची घोषणा केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा अत्यंत व्यापक आणि भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्वाचा प्रसंग होता. राज्याभिषेकावेळी शिवाजी महाराजांनी छत्रपती हे पद धारण केले. राज्याच्या कारभारासाठी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली आणि राज्याचा कारभार आणि पदे वाटून देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी महाराणी म्हणून सोयराबाई आणि युवराज म्हणून छत्रपती संभाजीराजे महाराजांचा ही अभिषेक करण्यात आला.

भवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे महाराजांना जाणे शक्य नव्हते. म्हणून ते प्रतापगडवरील प्रतिष्ठापना केलेल्या भवानीमाता देवीच्या दर्शनासाठी गेले. त्यावेळी सव्वा मण सोन्याची छत्री भवानी मातेस अर्पण केली. २१ मेला पुन्हा रागयगडावर ते धार्मिक विधीत गुंतून गेले. महाराजांनी २८ मेला प्रायश्चित्त केले. जानवे परिधान केले. दुसऱ्या दिवशी दोन राण्यांबरोबर पुन्हा विवाह विधी केला. त्यावेळी गागाभट्टांना ७००० होन तर इतर सर्व ब्राह्मणांना मिळून १७००० होन दक्षिणा दिली. दुसऱ्या दिवशी महाराजांची सोने, चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसे आणि लोखंड अशा सात धातूंनी वेगवेगळी तुला झाली. याशिवाय वस्त्र, कापूर, मीठ, खिळे, मसाले, लोणी, गुळ, फळे इत्यादींच्या तुला झाल्या. छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या शिवराज्याभिषेकाची तयारी कितीतरी महिने आधी सुरू झाली होती. राज्यभिषेकासाठी निश्चित अशी कोणती परंपरा नव्हती. प्राचीन परंपरा आणि राजनीतीवरील ग्रंथातून काही विद्वानांनी प्रथा-परंपरांचा अभ्यास केला. शिवराज्यभिषेकसाठी क्षत्रिय कुल शोधून मेवाड सिसोदिया वंशावळी काढण्यात आली. महाराजांचा वंश सिसोदिया वंश सिद्ध झाल्यानंतर शिवराज्यभिषेकासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून ब्राह्मणांना आमंत्रण देण्यात आले होते. सरदार राज्यातील श्रीमंत गणमान्य व्यक्ती, दुसऱ्या राज्यांचे प्रतिनिधी, विदेशी व्यापारी आणि सामान्य जनता असे सर्वच या सोहळ्याला उपस्थित झाले होते. प्रत्येक दिवशी एका धार्मिक विधीत आणि संस्कारात छत्रपती शिवाजी महाराज गढून गेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वप्रथम आपली आई जिजाबाई यांचे आशीर्वाद घेतले.

६ जून १६७४ ला राज्याभिषेक झाला. या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदैवतेला स्मरून, राज्याभिषेक सुरू झाला. गागाभट्ट आणि इतर ब्राह्मणांना यावेळीही आभूषणे आणि वस्त्रे भेट देण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजीमहाराजांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. राज्याभिषेकात राजाचा अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे हे दोन प्रमुख विधी होते. सोन्याने मढवलेल्या मंचावर महाराज बसले. शेजारी उपरण्याला साडीचे टोक बांधलेली सोयराबाई दुसऱ्या मंचावर, तर बाल संभाजीराजे मागे बसले होते. अष्टप्रधान मंडळातील आठ प्रधान गंगेसारख्या विविध नद्यांतून आणलेले पाण्याचे जलकुंभ घेऊन उभे होते. त्यानंतर ते जलकुंभांनी छत्रपती शिवाजीमहाराजांबर अभिषेक केला. त्यावेळी मंत्रोच्चारण केले जात होते आणि वाद्ये वाजविली जात होती. सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर



आज शिव राज्याभिषेक दिन

छत्रपती शिवाजी महाराजांनी लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक राज मुकुट घातला. आपल्या ढाल तलवार आणि धनुष्यबाणाची पूजा केली. मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात प्रवेश केला.

राज्यभिषेकाचे दालन हिंदू परंपरेनुसार ३२ शकुन चिन्हांनी सजवलेले होते. कृष्णाजी अनंत सभासद यांनी लिहिलेल्या ग्रंथात आलेले वर्णन - ३२ मण सोन्याचे (१४ लाख रुपये मूल्य असलेले) भव्य सिंहासन सोन्याच्या पत्र्याने मढवलेले होते. छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनावर आरुढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. प्रजेनी महाराजांना आशीर्वाद दिला. 'शिवराज की जय', 'शिवराज की जय'च्या घोषणा दिल्या गेल्या. सोन्याचांदीची फुले उधळली गेली. विविध तालवाद्य-सूरवाद्यांच्या जयघोषात आसमंत भरून गेले. ठरल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवत 'शिवछत्रपती' म्हणून उच्चार केला. राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जनांना खूप धन भेट म्हणून दिले. त्यांनी एकून सोळा प्रकारचे महादान केले. त्यानंतर विविध मंत्रिगणांनी सिंहासनापुढे जाऊन राजांना अभिवादन केले. छत्रपतींनी त्यांना या प्रसंगी विविध पदे, नियुक्तिपत्रे, धन, घोडे, हत्ती, रत्ने, वस्त्रे, शस्त्रे दान केली. हे सर्व सकाळी आठ वाजेपर्यंत संपले. समारंभ संपल्यावर, छत्रपती शिवाजी महाराज पहिल्यांदा एका देखण्या घोड्यावर स्वार होऊन जगदीश्वर मंदिराकडे गेले. हत्तीवर स्वार होऊन त्यांची मिरवणूक रायगडावर निघाली. इतर दोन हत्तींवर जरीपटका आणि भगवा झेंडे घेऊन सैन्याचे प्रतिनिधी होते. सोबत अष्टप्रधान आणि इतर सैन्य होते. रायगडावर ही मिरवणूक जात असताना सामान्य जनांनी फुले, चुरमुर, उधळले, दिवे ओवाळले. रायगडावरील विविध मंदिरांचे दर्शन घेऊन महाराज महालात परतले.

### अष्टप्रधान मंडळ

राज्याभिषेकावेळी शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळातील मंत्र्यांना संस्कृत नावे दिली आणि ही पदे वंशपरांगत न ठेवता मंत्र्यांच्या कर्तबगारीवर ठरण्यात येत असत.

१) पंतप्रधान (पेशवा) - सर्वोच्च मंत्रीपद मोरोपंत त्रिंबक पिंगळे
२) पंत अमात्य - रामचंद्र नीळकंठ
३) पंत सचिव सुरणीस - अनाजीपंत दत्तो
४) मंत्री वाकनीस - दत्ताजी पंत त्रिंबक
५) सेनापती सरनौबत - हंबीरराव मोहिते
६) पंत सुमंत (डाबिर) - रामचंद्र त्रिंबक
७) न्यायाधीश - निराजपंत रावजी
८) पंडितराव दानाध्यक्ष (सद्र-मुहतसिव)- मोरेश्वर पंडित

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. ६ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात उद्यापासून 'श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहा'चा मंगलारंभ

**देशमुख परिवारातर्फे भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन ▸ अधिकमासाच्या पावन पर्वावर अकोल्यात सुश्राव्य कथेची अमृतगंगा !**

प्रतिनिधी ६ जून



**अकोला:** परमपूज्य स्व. श्री पुंडलिकराव बंकटराव देशमुख (अण्णासाहेब) यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ अकोला शहरात भव्य 'श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे. पुरुषोत्तम (अधिक) मासाचे अत्यंत पवित्र औचित्य साधून आयोजित हा धार्मिक सोहळा रविवार, ७ जून ते शनिवार, १३ जून या कालावधीत गोरक्षण रोडवरील 'गोकुल धाम' येथे पार पडणार आहे. या कथेचे सुश्राव्य वाचन अकोल्याचे प्रसिद्ध ज्योतिषाचार्य आणि वेद परायण कथा वाचक पं. सुदर्शनजी शर्मा 'शास्त्री' हे आपल्या अमृतवाणीतून करणार आहेत.

कथेच्या प्रथम दिवशी, म्हणजेच उद्या रविवार, ७ जून रोजी अत्यंत मंगलमय आणि भक्तीमय वातावरणात या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ होणार आहे. या मंगल सोहळ्याचा प्रारंभ गोरक्षण संस्थेपासून निघणाऱ्या भव्य नयनरम्य शोभायात्रेने सकाळी ९ वा. होईल. हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाच्या तालावर ही शोभायात्रा दत्त कॉलनी येथील कथा स्थळापर्यंत मार्गक्रमण करेल. प्रथम दिवसाचे मुख्य धार्मिक प्रसंगात दुपारी ३ ते ६ या वेळेत मुख्य कथेला सुरुवात होईल. कथेच्या प्रथम चरणात भागवत महात्म्य, भक्तीदेवी अवतरण, मंगलाचरण आणि व्यास नारद चरित्र या अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगांचे रसग्रहण भाविकांना करता येईल. गोरक्षण रोडवरील साई मंदिराच्या मागे असलेल्या दत्त कॉलनीत गोकुळ धाम उभारण्यात आले आहे. या सात दिवसीय सोहळ्यात रोज विविध प्रासंगिक उत्सव व देव-अवतार सोहळे साजरे केले जाणार आहेत. अधिक मासातील भागवत श्रवण हे अनंत पटीने पुण्य फलदायी मानले गेले आहे. तरी या परम पवित्र ज्ञानयज्ञात अकोल्यातील आणि परिसरातील सर्व भाविक भक्तांनी सपरिवार व इष्टमित्रांसह उपस्थित राहून कथा श्रवणाचा आणि दर्शनाचा परम लाभ घ्यावा, असे भावपूर्ण व सस्नेह आवाहन आयोजक देशमुख परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# महागावात घरफोडीचा उलगडा; एक आरोपी अटकेत

प्रतिनिधी ६ जून




**महागाव / यवतमाळ :** फुकट नगर येथे महिनाभरापूर्वी घडलेल्या घरफोडी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) यशस्वी उलगडा केला आहे. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून चोरीस गेलेला सुमारे ३० हजार रुपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

महागाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील फुकट नगर येथे १ ते ३ मे २०२६ या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून दोन सीपीयू, संगणक मॉनिटर, प्रिंटर, कीबोर्ड व अन्य साहित्य असा २९ हजार ४५० रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी महागाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, गुन्ह्याचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय माहितीदाराकडून संशयिताबाबत माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सूरज प्रकाश पवार (वय २३, रा. फुकट नगर, महागाव) याला ताब्यात घेऊन चौकशी केली. सुरुवातीला त्याने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांच्या सखोल चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पवार याने संजय गायकवाड, अमोल पाटील आणि सार्थक काळे यांच्या मदतीने घरफोडी केल्याचे सांगितले. त्याच्या माहितीनुसार पोलिसांनी चोरीस गेलेले दोन सीपीयू, मॉनिटर, प्रिंटर, कीबोर्ड आणि माऊस असा सुमारे ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. या कारवाईमुळे घरफोडी प्रकरणाचा उलगडा झाला असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खामगावच्या रुचिता पांडुरंग धंदरचे सुयश

प्रतिनिधी ६ जून



**खामगाव :** १९ मे रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या Agentforce World Tour Mumbai Hackathon या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खामगाव येथील रुचिता पांडुरंग धंदर हिने विजेता पद प्राप्त केले आहे. या स्पर्धेत जगभरातील अनेक स्पर्धक सहभागी झाले होते. त्यापैकी ३७५ स्पर्धेकांची निवड करण्यात आली होती. रुचिताने तयार केलेला एआय प्रोजेक्ट ॲप हा सर्वोत्कृष्ट ठरला आणि रुचिता अंतिम फेरीत यशस्वी ठरली.

या स्पर्धेतील सर्वात विशेष बाब म्हणजे रुचिताने केलेले उत्कृष्ट (Presentation). तिच्या आत्मविश्वासपूर्ण मांडणीने, विषयावरील सखोल ज्ञानाने आणि प्रभावी सादरीकरण संवादकौशल्याने परीक्षकांना प्रभावित केले. विविध मूल्यांकन फेऱ्या, प्रश्नोत्तरे आणि कठोर परीक्षणानंतर रुचिताने आपल्या प्रथम क्रमांक पटकावला. संपूर्ण जगातील स्पर्धकांसमोर आपल्या कल्पना प्रभावीपणे मांडून रुचिताने आंतरराष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. तिला दहा लाख रुपये इतके पारितोषिक प्राप्त झाले. रुचिताच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिने खामगाव चे नाव उंचावले आहे. तिची मेहनत, जिद्द, नेतृत्वगुण आणि उत्कृष्ट सादरीकरण खूप महत्वाचे ठरले.

# पोलीस आयुक्तालय हद्दीतील 22 पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

प्रतिनिधी ६ जून



**अमरावती :** पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शुक्रवारी रात्री उशिरा २२ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या. गुन्हे शाखेचे प्रभारी असलेले पीआय संदीप चव्हाण यांची राजापेठ पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

नांदगाव पेठचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे आणि विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांची गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे.पोलीस आयुक्तांनी गुन्हे शाखेची युनिट १ आणि युनिट २ मध्ये विभागणी केली आहे. पोलीस आयुक्तांनी जाहीर केलेल्या बदलीच्या यादीत कोतवालीचे पोलीस निरीक्षक मनोहर कोटनाके यांचाही समावेश आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी सात सहायक पोलीस निरीक्षकांच्याही बदल्या केल्या आहेत. ज्यामध्ये कंट्रोल रूममधील राहुल राऊत यांची अप्लिकेशन शाखेत, वाळगावचे सचिन इंगळे यांची बडनेरा येथे, बडनेराचे संदीप हिवाळे यांची गाडगे नगर येथे, नागपुरी गेटचे अनंत ठाकरे यांची नांदगाव पेठ येथे, डायल ११२ च्या दिपाली राऊत यांची गाडगे नगर येथे, सिटी कोतवालीतील निरंजना उमाळे यांची फ्रेजरपुरा येथे बदली करण्यात आली. सीपी ओला यांनी शहरात कार्यरत असलेल्या २८ पीएसआयंच्याही बदल्या केल्या. यामध्ये अनेक पोलीस ठाण्यांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

नागपुरी गेटचे ठाणेदार हनुमंत उरलगोंडगवार यांना बडनेरा येथे, वाहतूक विभागाच्या रीता उईके यांना वळगाव येथे, वळगावचे वैभव पानसरे यांना वाहतूक विभागात, तर बडनेराचे सुनील चव्हाण यांना विशेष शाखेत पाठवण्यात आले आहे.

दहशतवाद विरोधी पथकाच्या सीमा दातळकर यांना खोलापुरी गेटचे प्रभारी, फेजरपुरा येथील रोशन सिरसाट यांना कोतवाली, राजापेठचे पुनित कुलट यांना नांदगाव पेठेचे प्रभारी, भातकुलीचे रवी राजुलवार यांना फेजरपुरा प्रभारी करण्यात आले. बडनेराच्या या कालावधीत दुय्यम पोलीस निरीक्षक प्रफुल्ल गीते यांची भात कुली येथे, गुन्हे शाखेचे संदीप चव्हाण यांची राजापेठ येथे, नांदगाव पेठ येथील दिनेश दहातोंडे यांची गुन्हे शाखा युनिट १ येथे, विशेष शाखेचे अतुल वार यांची गुन्हे शाखा युनिट २ येथे, भरोसा सेलच्या दीप्ती ब्राह्मणे यांची वाहतूक विभागात, फेजरपुरा येथील निलेश गवांदे यांची वाहतूक विभागात, वाहतूक विभागाच्या ज्योती विल्हेकर यांची भरोसा सेल येथे, प्रवीण वांगे यांची आर्थिक गुन्हे सेल येथे, राजेंद्र होळकर यांच्याकडे बडनेरा दुय्यमची जबाबदारी, सिटी कोतवाली येथील राजेंद्र पांडे यांच्याकडे सिटी कोतवाली दुय्यमची जबाबदारी, आणि खोलापुरी गेटचे ठाणेदार दिलीप वडगावकर यांच्याकडे नियंत्रण कक्षाची जबाबदारी देण्यात आली.

# खरीप हंगामात युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध

प्रतिनिधी ६ जून

**अकोला :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यानुसार येत्या पाच दिवसांत जिल्ह्यासाठी एकूण ७,१०१ मे.टन युरिया खत उपलब्ध होणार आहे. अकोला जिल्ह्यात येत्या पाच दिवसांत ७,१०१ मे.टन युरिया खत उपलब्ध होणार यामध्ये एनएफएल कंपनीचा १,९७६ मे.टन, आरसीएफ कंपनीचा २,६०० मे.टन तसेच संरक्षित खत साठा (बफर स्टॉक) २,४५० मे.टनपैकी १,२२५ मे.टन असा एकूण ५,८०१ मे.टन युरिया खताचा साठा येत्या तीन दिवसांत जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे. तसेच त्यानंतर नर्मदा बायो केम कंपनीचा १,३०० मे.टन युरिया खत साठा देखील जिल्ह्यात दाखल होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसाठी मोठ्या प्रमाणात युरिया खत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

जिल्ह्यास मंजूर असलेल्या आवंटनानुसार आवश्यक खतसाठा वेळेत उपलब्ध व्हावा यासाठी कृषी आयुक्तालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी युरिया खताच्या उपलब्धतेबाबत चिंता न करता आवश्यकतेनुसारच खत खरेदी करावे. जास्तीचे अथवा आगाऊ खत खरेदी करणे टाळावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन व कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे.

# 8 जूनपासून मृग नक्षत्राचा प्रारंभ ; शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा

प्रतिनिधी ६ जून

**मानोरा :** सृष्टीच्या अखंड ऋतू निसर्गचक्रानुसार परिवर्तनाची प्रक्रिया सुरू असून यंदाचा खरीप हंगामही आता अगदी दारात येऊन ठेपला आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे रोहिणी नक्षत्र ७ जून रोजी समाप्त होत असून ८ जूनपासून मृग नक्षत्राला प्रारंभ होणार आहे. ग्रामीण भागात पारंपरिक पंचांग आणि नक्षत्रांच्या आधारे हवामानाचा अंदाज घेण्याची प्रथा आजही कायम असून मृग नक्षत्राचे वाहन यंदा 'बेडूक' असल्याचे ज्योतिष अभ्यासकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे पावसाबाबत शेतकऱ्यांमध्ये आशावादी वातावरण निर्माण झाले आहे.

मानोरा तालुक्यातील शेतकरी सध्या खरीप हंगामाच्या पूर्वतयारीत व्यस्त असून शेतशिवारात मशागतीची कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत. तालुक्यात मुख्यत्वे कापूस, सोयाबीन, तूर, मिरची, हळद तसेच इतर नगदी व खाद्य पिकांची लागवड केली जाते. गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ झाली असली तरी अधूनमधून ढगाळ वातावरण निर्माण होत असल्याने शेतकरी पावसाच्या आगमनाकडे आशेने पाहत आहेत. सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनी पेरणीसाठी सज्ज केल्या आहेत. काही भागांत कपाशीची धूळ पेरणी सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे. तर कोरडवाहू शेती करणारे शेतकरी मात्र पहिल्या दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. पावसाच्या आगमनानंतरच मोठ्या प्रमाणावर सोयाबीन, तूर आणि इतर खरीप पिकांच्या पेरण्या सुरू होतील, अशी परिस्थिती आहे. सध्या शेतशिवारात ट्रॅक्टर, नांगर, वखर, रोटाव्हेटर यांची लगबग वाढली असून शेतकरी व शेतमजूर कामात गुंतलेले दिसत आहेत. अनेक ठिकाणी शेतजमिनीची मशागत, बांध दुरुस्ती, खत व बियाण्यांची खरेदी यासारखी कामे सुरू आहेत. जून महिन्याचा पहिला आठवडा संपत आला असला तरी यावर्षी भारतीय हवामान विभागासह विविध हवामान तज्ज्ञ संस्थांनी मान्सून सामान्य राहण्याची शक्यता व्यक्त केली असली तरी जागतिक स्तरावरील हवामानातील बदल, एल निनोचा संभाव्य प्रभाव आणि पावसाच्या वितरणातील अनिश्चितता यामुळे शेतकरी सावध पवित्रा घेत आहेत. पावसाचे प्रमाण, कालावधी आणि वितरण लक्षात घेऊनच पीक निवडीचे नियोजन केले जात असल्याचे कृषी तज्ज्ञ सांगतात. अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांची चिंता वाढताना दिसत आहे. गावागावातील चावड्यांवर, चौकांमध्ये आणि शेतांच्या बांधावर यंदाच्या पावसाबाबत तसेच कोणते पीक अधिक फायदेशीर ठरेल याबाबत चर्चा रंगताना दिसत आहेत. बियाणे, खतांचे दर, बाजारभाव आणि हवामानाचा अंदाज हेच सध्या शेतकऱ्यांच्या चर्चेचे प्रमुख विषय ठरत आहेत.

# अकरावीच्या प्रवेश अर्जात दुरुस्तीची विद्यार्थ्यांना संधी

प्रतिनिधी ६ जून

**अकोला :** अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेदरम्यान अर्जात चुकीची माहिती भरल्यामुळे प्रवेश नाकारल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण संचालनालयाने मोठा दिलासा दिला आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी त्यांना अर्जातील चुका दुरुस्त करण्याची आणखी एक संधी देण्याचा निर्णय शिक्षण संचालनालयाने घेतला आहे. यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना जारी करण्यात आल्या आहेत. नुकतीच अकरावी प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी पार पडली. मात्र, या फेरीदरम्यान अनेक विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना तांत्रिक किंवा मानवी चुका केल्याचे समोर आले.

# रक्तदान शिबिरे आयोजित करणे ही काळाची गरज - आ. नितीन देशमुख


प्रतिनिधी ६ जून



**अकोट :** वाढत्या लोकसंख्येसह अपघात, शस्त्रक्रिया व विविध आजारांमुळे रक्ताची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. आधुनिक विज्ञानाने मोठी प्रगती केली असली तरी रक्ताला अद्याप कोणताही पर्याय उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे रक्तदान ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून मानवतेची सेवा असल्याचे प्रतिपादन शिवसेना उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांनी केले.

आमदार नितीन देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील अग्रसेन भवन येथे शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे यांच्या पुढाकारातून शिवसेनेच्या वतीने शुक्रवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १२१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. शिबिराचे उद्घाटन माजी आमदार संजय गावंडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकार, उपजिल्हाप्रमुख दिलीप बोचे, तालुकाप्रमुख अविदादा गावंडे, जिल्हा महिला संघटिका मायाताई म्हैसने, जिल्हा समन्वयक शाम गावंडे, प्रा. अतुल म्हैसने, नगरसेविका विजयाताई बोचे, वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष रोशन पर्वतकर, अकोला शहर प्रमुख राहुल कराळे, माजी नगरसेवक गणेश बरेठिया, सामाजिक कार्यकर्ता बादल अहिर, माजी नगराध्यक्ष मनीषाताई मते, डॉ. प्रशांत अढाऊ, डॉ. गजानन महल्ले, डॉ. गुंजन वालसिंगे, सुरेश मामा बोंडे, विजयाताई चौधरी, माधव अनासने, पत्रकार संजय आठवले, मुकुंद कोरडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामदास मंगळे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रकाश गायकी यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी दिलीप बोचे, अविदादा गावंडे, सुनील रंदे, अक्षय घायल यांच्यासह शिवसेनेच्या असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. रक्तसंकलनाची जबाबदारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला तसेच अकोला डायग्नोस्टिक ब्लड सेंटर यांच्या पथकांनी सांभाळली.

# पर्यावरण आणि विकास परस्पर विरोधी नसून पर्यावरण म्हणजेच विकास– राज्यपाल

प्रतिनिधी ६ जून

**मुंबई:** जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त वांद्रे येथील कार्टर रोड ॲम्फीथिएटर येथे आयोजित विशेष कार्यक्रमात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक जनसहभागाचे महत्त्व अधोरेखित करत, 'आजच्या काळात पर्यावरण आणि विकास हे परस्परविरोधी नसून पर्यावरण म्हणजेच विकास आहे,' असे प्रतिपादन केले.

आपल्या भाषणात राज्यपाल वर्मा म्हणाले की, त्यांनी सार्वजनिक जीवनाची सुरुवात पर्यावरणवादी कार्यकर्ता म्हणून केली असून ईशान्य भारतातील संस्कृतीत 'प्रकृती देवो भव' ही भावना खोलवर रुजलेली आहे. निसर्ग हा दैवी अंश असलेला असून त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

पूर्वी 'पर्यावरण की विकास' हा चर्चेचा विषय होता. मात्र आज शाश्वत विकासाची संकल्पना जगभर स्वीकारली जात असून पर्यावरण संरक्षणाशिवाय विकासाची कल्पनाच करता येत नाही. पर्यावरणीय असंतुलनाचा सर्वाधिक फटका समाजातील गरीब आणि दुर्बल घटकांना बसतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही केवळ नैसर्गिक साधनसंपत्ती जपण्याची बाब नसून सामाजिक न्यायाची आहे, असे राज्यपालांनी नमूद केले.

भारतीय संस्कृती आणि परंपरेत निसर्गाशी सुसंवादाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. 'वनस्पतये शांती'सारख्या प्रार्थनांमधून निसर्गातील शांतता आणि मानवी जीवनातील समृद्धी यांचे नाते अधोरेखित करण्यात आले आहे. निसर्गाचे अतिरेकी शोषण केल्यास त्याचे दुष्परिणाम मानवजातीलाच भोगावे लागतात, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे, असे ते म्हणाले.

पर्यावरण विषय केवळ चर्चासत्रे आणि परिसंवादांपुरता मर्यादित न ठेवता तो कृतीत उतरविण्याचे आवाहन करताना राज्यपालांनी पर्यावरण संवर्धनाकडे राष्ट्रसेवा आणि भावी पिढ्यांच्या सुरक्षित भविष्याच्या दृष्टीने पाहण्याची गरज व्यक्त केली. नैसर्गिक साधनसंपत्ती ही मानवजातीची सामायिक संपत्ती असून तिचे जतन आणि संवर्धन करणे हे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चित्रफितीद्वारे शुभेच्छा संदेश देताना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, मानवजातीच्या शाश्वत भविष्यासाठी पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी भामला फाउंडेशनतर्फे दरवर्षी विविध उपक्रम आणि अभियानांचे आयोजन केले जाते, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता वाढून निसर्ग संवर्धनासाठी सकारात्मक कृती करण्याची प्रेरणा मिळते. प्रत्येक नागरिकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि नैसर्गिक संसाधनांच्या जतनासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची नव्हे तर प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

'नमस्कार भूमी २' या पर्यावरण जनजागृती उपक्रमाचा शुभारंभ

कार्यक्रमादरम्यान राज्यपालांच्या हस्ते 'नमस्कार भूमी २' या पर्यावरण जनजागृती उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला तसेच त्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रेरणा गीताचे अनावरण करण्यात आले.

यावेळी राज्यपालांनी 'भावना फाउंडेशन'तर्फे तयार करण्यात आलेल्या 'भूमी नमस्कार' या प्रेरणादायी गीताचे विशेष कौतुक केले. हे गीत पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देणारे असून व्यापक जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्लास्टिक प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश यावेळी उपस्थितांना देण्यात आला. पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला.




यावेळी आमदार सचिन अहिर, महाराणा प्रताप यांचे वंशज मेवाडचे श्रीजी लक्षप्रताप महाराज, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक अनिल गायकवाड, राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती, गौर गोपाल दास अभिनेते सोनू सूद, गायक शंकर महादेवन, अभिनेत्री मलायका अरोरा, रूपा गांगुली, गायक बादशाह, संगीतकार हिमेश रेशमिया, गायिका नेहा कक्कर, सीमा सिंग, विजय कारिया तसेच भामला फाउंडेशनचे संस्थापक आसिफ भामला यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

## जागतिक व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रोड्रिग्स व शिष्टमंडळाचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन



**मुंबई:** व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रोड्रिग्स व त्यांच्या शिष्टमंडळाचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी व्हेनेझुएलाचे भारतीय राजदूत पी. के. अशोक बाबू यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ राजेश गवांदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिनव देशमुख, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच व्हेनेझुएलाचे प्रतिनिधी आणि इ. मान्यवर उपस्थित होते.

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर धामणी येथे अपघातांची मालिका; ठेकेदाराचा हलगर्जीपणा, नागरिक संतप्त

**मुंबई:** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील धामणी परिसरात अपघातांची मालिका सुरू असून चौपदरीकरणाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीच्या निष्काळजीपणामुळे वाहनचालकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

रस्त्याच्या मध्यभागी टाकण्यात आलेल्या मातीच्या ढिगाऱ्यामुळे पुन्हा एकदा छोट्या पिकअप वाहनाचा शुक्रवारी रात्री अपघात झाला असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

सध्या संगमेश्वर तालुक्यात महामार्ग चौपदरीकरणाचे काम सुरू असले तरी कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजनांचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी दिशादर्शक फलक, परावर्तक चिन्हे आणि इशारा फलक नसल्याने वाहनचालकांना रात्रीच्या वेळी तसेच पावसाळ्यात मार्गाचा अंदाज घेणे कठीण जात आहे. परिणामी धामणी येथे सलग दुसऱ्या दिवशी अपघात घडल्याची घटना घडली आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला असून महामार्गाचे काम अत्यंत बेफिकिरीने सुरू असल्याचा आरोप केला आहे. वारंवार अपघात होऊनही संबंधित यंत्रणा आणि ठेकेदार कंपनीकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली.



संगमेश्वर-धामणी गावचे माजी पोलीस पाटील अनंत पुरुषोत्तम पाध्ये यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. सततच्या अपघातांना जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांविरुद्ध मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. यासंदर्भात संबंधित विभागाला निवेदन देण्यात आले असून तातडीने सुरक्षा उपाययोजना राबवून अपघात रोखावेत, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## सीकेपीचे आंदोलन होऊ नये म्हणून सरकारकडून माध्यम आणि तरुणांवर दबावतंत्र, संजय राऊत यांचा आरोप

**मुंबई:** देशातील नीट पेपरफुटीच्या महाघोटाळ्याचे केंद्रबिंदू हे महाराष्ट्रच आहे. लाखो तरुणांचे भविष्य उद्धवस्त करणारा हा प्रकार केवळ शिक्षण खात्यापुरता मर्यादित नसून तो एक गंभीर गुन्हा आहे.

म्हणूनच आधी देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी केली आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आंदोलनापूर्वी माध्यमांशी बोलताना त्यांनी केंद्र सरकारच्या दबावतंत्रावर जोरदार हल्लाबोल केला.

मुंबईत माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, नीट पेपरफुटीविरोधात या देशात




आंदोलनं यापूर्वी झालेली आहेत. लखनऊ, आसाम, दिल्लीष्ठ देशाच्या अनेक प्रमुख शहरांमध्ये पेपरफुटीविरोधात आंदोलनं झाली. आणि सरकारने ती दडपण्याचा प्रयत्न केला. त्या आंदोलनाला प्रसिद्धी मिळू नये यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केले. त्यामुळे आता तरुण वर्ग संतप्त होऊन रस्त्यावर उतरलेला आहे आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागतोय. यासंदर्भातल्या कोणत्याही बातम्या प्रसिद्ध होऊ नये याची तजवीज सरकारने केली. त्यासाठी माध्यमांवर दबाव आणलेले आहेत, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

कॉक्रोच जनता पार्टी आणि त्याचे संस्थापक अभिजीत दीपके हे दिल्लीत जंतरमंतरला येऊन पेपर फुटीच्या विषयावर आंदोलन करणार आहेत. त्यांचे आंदोलन यशस्वी झालं, या आंदोलनात मोठ्या संख्येने तरुण वर्ग उतरला तर सरकारला त्याची दखल घ्यावी लागेल. पण हे आंदोलन यशस्वी होऊ नये तरुणांनी तिथे पोहचू नये यासाठी सरकार दबावतंत्र अवलंबत आहे. जंतरमंतर परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात आहेत. तरुणांनी आंदोलनाला पोहचू नये यासाठी पोलिसांना विषेश जबाबदारी देण्यात आली असल्याचे संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे.

तर तुम्हाला स्वच्छ प्रशासन झिरो भ्रष्टाचार याविषयी बोलण्याचा अधिकार नाही

संजय राऊत पुढे म्हणाले की, लाखो तरुण रस्त्यावर उतरणं आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनाम्याची मागणी या दोन्ही गोष्टींना मी यश मानतो. एकतर लाखो नसले तरी हजारो तरुणांनी आंदोलनात उतरणं आणि त्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होणं या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. इतकं मोठं स्कॅंडल होऊन हजारो तरुणांचं भविष्य त्यात फसलेलं आहे. तरीही नरेंद्र मोदी त्या मंत्र्याचा राजीनामा घेत नसतील तर तुम्हाला स्वच्छ प्रशासन झिरो भ्रष्टाचार याविषयी बोलण्याचा कोणता अधिकार नाही, असे म्हणत संजय राऊत यांनी निशाणा साधला.

## ग्रंथालयांना वार्षिक अहवाल लायब्ररी ग्रँट मॅनेजमेंट सिस्टीम प्रणालीने सादर करण्याचे निर्देश : चंद्रकांत दादा पाटील

**मुंबई:** महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाने राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक व ग्रामपंचायत ग्रंथालयांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे वार्षिक अहवाल लायब्ररी ग्रँट मॅनेजमेंट सिस्टिम (एलजीएमएस) या ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करण्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिले आहेत.

मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या १४ जुलै २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक ग्रंथालयांना वार्षिक अहवाल तसेच लेखापरीक्षण अहवाल एलजीएमएस प्रणालीवर अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार चालू वर्षासाठी अहवाल सादर करण्याची प्रक्रिया ३० जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.राज्यातील सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक, जिल्हा ग्रंथालय



अधिकारी तसेच शासनमान्य सार्वजनिक व ग्रामपंचायत ग्रंथालयांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ग्रंथालयांना आवश्यक मार्गदर्शन करून वार्षिक अहवाल अचूक व वेळेत सादर होतील यासाठी विशेष दक्षता घ्यावी, असे मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी सांगितले. तसेच, विहित मुदतीत अहवाल सादर न करणाऱ्या किंवा अपूर्ण अथवा चुकीची माहिती सादर करणाऱ्या ग्रंथालयांना अनुदान मंजूर करण्यात येणार नसल्याचा इशाराही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिला आहे.

## कॉक्रोच' म्हणून हिणवणे योग्य नाही, त्यांना कमी लेखू नका- उद्धव ठाकरे

**मुंबई :** देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटीच्या प्रकरणावरून आता राजकीय वातावरण तापले आहे. दिल्लीतील जंतरमंतर येथे देशभरातून आलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. याच आंदोलनाचा दाखला देत माजी मुख्यमंत्रीमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर शेलक्या शब्दांत टीका केली आहे. खासदार संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे यांचे हे जाहीर निवेदन सोशल मीडियावर शेअर केले आहे.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या निवेदनात विद्यार्थ्यांच्या वेदनांना वाट करून दिली आहे. ते म्हणाले, 'ज्यांना आपण देशाचे भाग्यविधाते, देशाचे भवितव्य म्हणतो, ते हजारो तरुण आज आपल्या वेदना आणि भविष्याची चिंता घेऊन रणरणत्या उन्हात रस्त्यावर उतरले आहेत. दिल्लीच्या जंतरमंतरवर या तरुणांचे आंदोलन सुरू झाले आहे.'

आंदोलक तरुणांना 'कॉक्रोच' म्हणून हिणवल्या जाणाऱ्या वक्तव्याचा उद्धव ठाकरेंनी निषेध केला आहे. 'त्यांना 'कॉक्रोच' म्हणून हिणवणे आणि न्याय नाकारणे चुकीचे आहे. ‑ऊं पेपरफुटीमुळे देशातील लाखो युवा वर्ग उद्धवस्त झाला आहे. आज हे सर्व पीडित तरुण-तरुणी न्याय मिळवण्यासाठी आक्रोश करत आहेत,' अशी टीका ठाकरेंनी केली.

केंद्र सरकारला गंभीर इशारा देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सरकारला या पीडित तरुणांचे म्हणणे ऐकावेच लागेल. 'कोक्रोच ना कमी लेखू नका, हा इशारा जंतरमंतरवरील आंदोलनाने सरकारला दिला आहे!' असे म्हणत त्यांनी सरकारला विद्यार्थ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असे स्पष्ट केले. संजय राऊत यांनी ठाकरेंचे हे निवेदन सोशल मीडियावर शेअर केले आहे.




देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटीच्या प्रकरणावरून आता राजकीय वातावरण तापले आहे. दिल्लीतील जंतरमंतर येथे देशभरातून आलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. याच आंदोलनाचा दाखला देत माजी मुख्यमंत्रीमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर शेलक्या शब्दांत टीका केली आहे. खासदार संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे यांचे हे जाहीर निवेदन सोशल मीडियावर शेअर केले आहे. उद्धव ठाकरे यांनी आपल्या निवेदनात विद्यार्थ्यांच्या वेदनांना वाट करून दिली आहे. ते म्हणाले, 'ज्यांना आपण देशाचे भाग्यविधाते, देशाचे भवितव्य म्हणतो, ते हजारो तरुण आज आपल्या वेदना आणि भविष्याची चिंता घेऊन रणरणत्या उन्हात रस्त्यावर उतरले आहेत. दिल्लीच्या जंतरमंतरवर या तरुणांचे आंदोलन सुरू झाले आहे.' आंदोलक तरुणांना 'कॉक्रोच' म्हणून हिणवल्या जाणाऱ्या वक्तव्याचा उद्धव ठाकरेंनी निषेध केला आहे. 'त्यांना 'कॉक्रोच' म्हणून हिणवणे आणि न्याय नाकारणे चुकीचे आहे. NEET पेपरफुटीमुळे देशातील लाखो युवा वर्ग उद्धवस्त झाला आहे. आज हे सर्व पीडित तरुण-तरुणी न्याय मिळवण्यासाठी आक्रोश करत आहेत,' अशी टीका ठाकरेंनी केली. केंद्र सरकारला गंभीर इशारा देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सरकारला या पीडितांना कमी लेखू नका, हा इशारा जंतरमंतरवरील आंदोलनाने सरकारला दिला आहे!

## महामुंबईत १४ मार्गांवर ३०० किमी लांब 'मेट्रो नेटवर्क' उभारणार; वर्षाअखेरीस १२० किमीचा टप्पा होणार पार

**मुंबई:** मुंबईत मेट्रोचं जाळं ९० किलोमीटर पार पोहोचलं आहे. २०२५मध्ये ॲक्वा लाइन सुरू झाल्यानंतर हे जाळं ८० किलोमीटर लांब विस्तारलं होतं. तेव्हाच दिल्ली आणि बंगळुरूनंतर मुंबई भारतातील तिसरं सर्वात लांब मेट्रो नेटवर्क असलेलं शहर बनलं.

भविष्यात शहरात ९ मेट्रो मार्गिकां प्रस्तावित आहेत. यापैकी काही पूर्णपणे नवीन असून काही जुन्या मार्गांचा विस्तार करून तयार करण्यात येणार आहेत. त्यामुळे संपूर्ण मेट्रो जाळं ३०० किलोमीटरपेक्षा लांब होणार आहे. दिल्ली नंतर सर्वात लांब मेट्रो नेटवर्क असलेलं मुंबई तिसरं शहर बनेल. पण हा दिवस खूप लांब असला तरी वर्षाअखेरीस मुंबईतील मेट्रो १२० किलोमीटर लांब विस्तारणार आहे.

कोणत्या मार्गिका कार्यरत आहेत?



मुंबई मेट्रोच्या १४ प्रमुख मार्गिका आहेत. ब्लू लाइनवरील मुंबई मेट्रो लाइन १ (वर्सोवा ते घाटकोपर) सर्वप्रथम २०१४मध्ये सुरू झाली होती. त्यानंतर ८ वर्षांपर्यंत एकही नवीन मेट्रो लाइन सुरू नाही झाली. यावेळी अनेक मार्गांवरील मेट्रोचे प्रस्ताव मांडण्यात आले पण पहिल्या मार्गिकेच्या भूसंपादनात आणि बांधकामात अडथळे येऊ लागले. म्हणून मेट्रो लाइन ३ ॲक्वा लाइन पूर्णपणे भूमिगत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. पण या मार्गिकेच्या बांधकामात वेळ आणि खर्चही मोठ्या प्रमाणा वाढल्यामुळे विलंब झाला. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यापुढील सर्व मार्गिका उन्नत असतील असा निर्णय घेतला.

त्यानंतर मुंबई मेट्रो २चं बांधकाम २०१६मध्ये सुरू झालं. यानंतर २०२२मध्ये यलो लाइनवरील मुंबई मेट्रो २ए (दहिसर पूर्व ते डहाणूकरवाडी) ही मार्गिका सुरू झाली. त्यानंतर रेड लाइनवरील दहिसर पूर्व ते आरेपर्यंत मेट्रो लाइन ७ सुरू झाली. त्यानंतर २०२३मध्ये मेट्रो २ए अंधेरी पूर्वेपर्यंत वाढवण्यात आली आणि लाइन ७ गुंदावलीपर्यंत. पश्चिम उपनगरातील पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि लिंक रोडवर या दोन्ही मार्गिका धावतात. यादरम्यान, एक नवीन पर्पल लाइन नवी मुंबईमध्ये सुरू झाली. नवी मुंबई मेट्रो लाइन १ (बेलापूर ते पेंढार)चं काम २०२३मध्ये पूर्ण झालं. त्यानंतर शहरातील सर्वात महत्त्वाकांक्षी मार्गिकेचा पहिला टप्पा २०२४मध्ये सुरू करण्यात आला. ॲक्वा लाइनच्या पहिल्या टप्प्यात आरे जेव्हिएलआर ते बीकेसी पर्यंत सुरूवात करण्यात आली. त्यानंतर ऑक्टोबर २०२५मध्ये कफ परेडपर्यंत विस्तार करून ॲक्वा लाइन पूर्णपणे कार्यरत झाली. ही शहरातील सर्वात इंटरकनेक्टेड लाइन आहे. यानंतर २०२६मध्ये दोन नव्या मार्गिका सुरू झाल्या. यलो लाइनवरील लाइन २बी (अंधेरी पश्चिम ते मंडाले) मार्गिकेचा पहिला टप्पा (मंडाले ते डायमंड गार्डनर) सुरू झाला आहे. याशिवाय रेड लाइनचा मुंबईतच्या उत्तरेकडीही विस्तार झाला आहे. मेट्रो लाइन ९ (दहिसर ते मिरा भाईंदर) कार्यरत झाली असून उत्तरेकडील उपनगरांमधील लोकलवरील ताण कमी झाला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135